ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# अवंतिकाबाई गोखले यांचे सामाजिक जीवनातील योगदान



**प्रा.एस.वाय.यमगर**
**क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल.**

मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेली सामान्य व्यक्ती जेव्हा दूरदृष्टी व त्यागी वृत्ती असलेल्या व समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची कळकळ असणाऱ्या व्यक्तीच्या सानिध्यात येते, तेव्हा काय मिळवू शकते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे अवंतिकाबाई गोखले होय. नऊ वर्षांच्या अवंतिका बाईंनी व्यवसायाने इंजिनियर असलेल्या आपल्या पतीच्या म्हणजेच बबनराव गोखले यांच्या विनंतीवरून शिकायला सुरुवात केली. त्यांच्या पतीच्या प्रोत्साहनामुळे अवंतिका बाईंनी परिचारिका व सुईनीचा अभ्यासक्रम1901 साली पूर्ण करून त्यामध्ये प्रथम वर्ग मिळवला.नंतरच्या कालखंडामध्ये देवीची मोठी साथ ही भारतामध्ये आलेली होती. परमेश्वरी कोपामुळे देवीचा रोग होतो अशी सर्व सामान्य माणसाची श्रद्धा होती. अवंतिका बाईंना मात्र हा रोग म्हणजे देवाचा कोप नसून लसीकरणाच्या अभावी हा रोग होतो. असे जनतेला पटवून देण्याचा प्रयत्न केला. देवीची लागण झालेल्या रोगयाची सेवा करण्यात त्यांनी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. वयाच्या 21व्या वर्षी समाज सेवा करण्याची त्यांची तळमळ दिसून आली. त्याचबरोबर त्यांनी समाजात आरोग्य विषयक जाणीव निर्माण करण्याचाही प्रयत्न केला.

1913 पर्यंत अवंतिकाबाई सर्वसामान्य आयुष्य जगल्या. नंतर त्यांना इचलकरंजीच्या राणीसाहेबांच्या सोबतीन म्हणून इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. इंग्लंडमधील वास्तव्यात त्यांनी अनेक इस्पितळे , बालवाड्या आणि स्वयंसेवी संघटनांना भेटी दिल्या. या सर्व कामाशी धनीक व प्रतिष्ठित कुटुंबातील स्त्रियांचा संबंध होता शाब्दिक कार्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीसाठी समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही. या उलट त्या क्षेत्रातील प्रत्यक्ष कामात समाजाचा दृष्टिकोन बदलू शकतो. याची अवंतिका बाईंना जाणीव झाली.

चंपारण्य येथील महात्मा गांधींच्या अन्यायविरुद्धच्या लढ्यामध्ये अवंतिकाबाई या सहभागी झाल्या होत्या.त्यांनी निरक्षरता अज्ञान आणि आरोग्याच्या हानी याविरुद्ध लढा पुकारला. त्यांनी स्वच्छते संबंधीची प्रात्यक्षिके लोकांना करून दाखवली.आणि स्त्रिया वप्रौढ यांच्या शिक्षणाचे महत्त्व जोरदारपणे प्रतिपादन केले ते अतिशय अवघड कार्य होते, ते त्यांनीपार पाडले.

## अवंतीकाबाई आणि हिंद महिला समाज

चंपारण्य येथील कामगिरी यशस्वी पूर्ण केल्यावर भारतीय स्त्रियांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून1918 साली त्यांनी हिंद महिला समाजाची सुरुवात केली. समाजातील विविध भागातील लोकांच्या परस्परांच्या क्रिया जाणून घेऊन हिंद महिला समाजाच्या वाढीला हातभार लावण्यात त्यांनी खूप कष्ट घेतले. शिवणकाम ,विणकाम ,ग्रंथालय सुविधा , आरोग्य विषयक जाणीव निर्माण करणे,स्त्रियांचे शिक्षण यासारखे विविध उपक्रम त्यांनी हाती घेतले. अवंतिका बाईंनी हिंद महिला समाजात खादी लोकप्रिय केली हिंद महिला समाज विमेन अँड नेशन या विषयावर पंडित मदन मोहन मालवीय , महात्मा गांधी, गोपाळकृष्ण देवधर , डॉक्टर कुरतकोटी व

लोकमान्य टिळक यासारख्या थोर व्यक्तींच्या व्याख्यानमाला आयोजित करीत असे.स्त्रियांना शिक्षण देणे व त्यांच्यामध्ये जागृती करणे हे त्यामागील उद्देश होते. अनेक स्त्रियांचा स्वातंत्र चळवळीत सक्रिय सहभागी होणे हे त्या प्रयत्नांचे फळ होय.

## मुंबई महापालिकेत अवंतिकाबाई

1924 साली त्या मुंबई महापालिकेमध्ये निवडून आल्या. मुंबई महापालिकेच्या त्या पहिल्या महिला सदस्य होत्या. मुंबई महापालिकेत त्यांनी विविध वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा घडवून आणली. शाळेच्या आवारात फेरीवाल्यांना मनाई,चौपाटी क्षेत्रातील स्वच्छता, महानगरपालिकेच्या दवाखान्यात स्त्री डॉक्टरची सेवा उपलब्ध करून देणे इत्यादी विषयावर त्यांनी महापालिकेत चर्चा करून आणली. महापालिकेच्या स्थायी समितीच्या सदस्य झाल्यावर त्यांनी सदस्यांना दिला जाणारा खास भत्ता स्वतःसाठी स्वीकारण्यास नकार दिला. आणि खास भत्ता नाकरता येत नसल्यामुळे त्यांनी तो निरनिराळया संस्था व गरजू व्यक्तींना वाटून टाकला. सार्वजनिक आरोग्य समिती व स्थायी समितीच्या सदस्य या नात्याने त्यांनी अनेक संघटना बरोबर काम केले.यामध्ये मुक्तीसेना बचावगृह, मुंबईची दक्षता संघटना, सेंट कॅथरीन बचाव गृह, नौरोजी वाडिया यांच्या नावाचे प्रसुतीग्रह महिला शिवण वर्ग कनिष्ठ समजले जाणाऱ्या जाती झाडूवाले व इतर लोकांच्या सुधारणांना त्यांनी प्रोत्साहन दिले. महात्मा गांधीजींच्या1930 च्या सविनय कायदेभंग चळवळीमध्ये व सत्याग्रहांमध्ये त्यांनी स्वतः सहभाग घेतला. त्यांनी हौसा मेहता , लीलावती मुळशी, गंगाबाई पोशा, नाखवा पेरिन, कॅप्टन इत्यादी कॉंग्रेस जन असणाऱ्या स्त्रियांबरोबर सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

अवंतिका बाईच्या आयुष्याचीरुपरेषा दोन भागांमध्ये विभागता येते.

१) 1917 ते 1933 सक्रिय राजकारण.

२) 1933 ते 1949 समाजासाठी सक्रिय योगदान.

स्वातंत्र्य चळवळ असो किंवा समाजसेवा असो दोन्ही टप्प्यात कामकाजासाठी झोकून देण्याची त्यांची अंगभूत वृत्ती दिसून येते.वैयक्तिक फायद्यासाठी नेतृत्व स्वीकारण्यात त्यांना स्वारसयअसे नव्हते.त्या जरी सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्या, तरी गांधीजींनी सोपवलेल्या सकारात्मक कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्या अस्पृश्यांना मदत करीत, आणि सूतक ताई करीत असत 1947 मध्ये त्यांना कॅन्सरचा त्रास असल्याचे निदान करण्यात आले वैद्यकीय उपचारांनी त्या बऱ्याच सुधारल्या पण आणखी एका दुर्दैवाशी त्यांना सामना करावा लागला त्यांच्या यजमानांना अर्धांगवायूचा झटका आला. आणि अवंतिका बाईंनी त्यांची सेवा करून त्यांचा जीव वाचवला.

## अवंतिका बाईंची योगदान --

अवंतिका बाई कष्टाळू व प्रामाणिक होत्या. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्न त्यांच्या कुटुंबीयांची विशेषता त्यांच्या यजमानांची साथ मिळाली. परिचारिका व सुईन म्हणून त्यांनी अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रात त्या सर्वोत्तम ठरल्या.आजच्या स्त्रियांसाठी त्या प्रेरणास्त्रोत आहेत,विविध संधी व सुविधा उपलब्ध असल्यामुळे आजच्या स्त्रिया अवंतिका बाईपेक्षा सुदैवी आहेत. सामाजिक व राजकीय जागृतीच्या काळात अवंतिका बाईंचा जन्म झाला होता. आणि महात्मा गांधींच्या प्रभावाखाली आल्यावर शिस्तबद्ध गुणामुळे त्यांच्या आयुष्याने नवेच वळण घेतले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीची नाडी त्यांनी ओळखली होती. त्यामुळेच दारूच्या व परदेशी कापडाच्या दुकानां पुढील निदर्शनाचे महतव त्यांच्या लक्षात आले होते. सर्वात उच्च समजले जाणाऱ्या ब्राह्मण जाती त्यांचा जन्म झाला होता. ज्या समाजात अस्पृश्यता पाळी जाते त्या समाजात त्यांनी अस्पृश्यता निवारण्यास पाठिंबा दिला. आणि व्यक्तीचश स्वतःलाही त्या कार्यात गुंतवून घेतली. परंपरा व आधुनिकता यांचा सुरेख परिपूर्ण संगम त्यांच्या ठाई झालेला होता. शिक्षण, सामाजिक सहभाग व राजकीय जाणीव या बाबींच्या साह्याने पुरोगामी जीवनपद्धती स्वीकारतानाच काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या परंपरा व हिंदू कुटुंबातील जबाबदारी यांचे भान त्यांनी स्वीकारले.

अवंतिका बाईचे जीवन म्हणजे यशस्वी नेता होण्यासाठी लागणारी सर्व गुणवैशिष्ट्ये असलेल्या स्त्रीचा उत्तम नमूना आहे .1933 नंतर त्यांनी कोणतीही जबाबदारी स्वीकारली नाही .हिंद महिला समाजातील स्त्रियांची दुःखापासून मुक्तता करण्याची त्यांची आवडते कार्य त्या मनापासून करीत राहिल्या. भारताला 1947साली स्वातंत्र्य मिळाले स्वातंत्र्य सैनिक या संज्ञेचे व्यापक अर्थाने ते सच्चा स्वातंत्र सैनिक होत्या. महात्मा गांधीजींच्या वर अपार श्रद्धा त्यांची होती. गांधीजींचा खून झाल्यावर त्यांचे अंतकरण अतिशय दुःखी व छिन्नविच्छिन्न झाले त्यानंतर दोनच वर्षात त्यांचा मृत्यूझाला.

**संदर्भ साहित्य --**

१) विनायक तिवारी आदर्श हिंद महिला मुंबई,सेक्रेटरी हिंद महिला समाज 1950 या शोधनिबंधातील चरित्रात्मक तपशील.
२) मुंबई महापालिकेच्या कामकाजाचे अहवाल 1920 ते 1933 पृष्ठ. 616 ते 977.
३) मुंबई महापालिकेच्या कामकाजाच्या अहवाल, 1925,26 पृष्ठ 837 भाग एक 1929 30 भाग एक.
४) य. दि फडके विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड चार श्री विद्या प्रकाशन पुणे.1993 पृष्ठ 59.
५) य.दि .फडके उपरोक्त पृष्ठ 69.
६) गव्हर्मेंट ऑफ बॉम्बे गृह खाते स्पेशल फाईल क्रमांक 800,6 जानेवारी 1932 पृष्ठ 81.